

R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23, Published on 15th of every month




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५६ वे, अंक ९वा, मुंबई । नोव्हेंबर २०२३
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 9, Mumbai I November 2023
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



श्री. पद्माकर यशवंत मंजुरे यांची अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास रु. १ लाखाची देणगी




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक ९वा,
नोव्हेंबर २०२३
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई-मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in



## मंगळवेढा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थी व हितगुज सखी मंच महिला सदस्यांचा सत्कार





**सर्व सभासद, हिंतचिंतक, देणगीदार, जाहिरातदार, ज्ञातीतील समस्त बंधु-भगिनींना दीपावलीच्या हार्दीक शुभेच्छा.**


FE BEST BANKS AWARDS
IndusInd Bank
THE ULTIMATE
SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive
Interest Rates
on Savings Account and
Fixed Deposits
VIDEO
Branch
Face-to-face banking
anytime, anywhere
My ACCOUNT
My NUMBER
Freedom to choose your
account number
Indus Mobile
All-in-one app for banking,
shopping, travel,
payments and much more
GET UP TO
20% OFF
on food & groceries
from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET
ONE FREE
movie ticket
on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank



HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
Serving
75+
Countries
Worldwide
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# संपादकीय

देशाच्या आणि राज्याच्या आर्थिक आणि व्यावसायिक घडामोडीचे प्रमाण वाढूनही बेरोजगारीचे प्रमाण वाढून २.५ वर्षाच्या उच्चांकी पातळीवर गेले आहे. यामध्ये ग्रामीण भागाचा वाटा मोठा असून या महिन्यात बेरोजगारीचे प्रमाण ४.६२ टक्यांनी वाढले आहे. सेंटर फॉर मॉनिटरींग इंडीयन इकोनॉमीच्या ताज्या आकडेवाडीनुसार देशातील बेरोजगारीचे प्रमाण १०.०५ टक्यांवर पोहचले आहे. २०२१ नंतरचे हे सर्वाधिक प्रमाण आहे. देशातील बहुतांश भागामध्ये मान्सूनकाळात चांगला पाऊस न झाल्याने अन्नधान्यांचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात ग्रामीण भागातील बेरोजगारीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत असून आर्थिक वर्ष २०२३ आणि २०२४ मध्ये देशाचा विकास दर ६ टक्केहून अधिक राहण्याची शक्यता आहे. असे असले तरी आगामी काळात मोठ्या प्रमाणावर नोकऱ्यांची निर्मिती होण्याची शक्यता कमी आहे. मा. पंतप्रधान मोदी यांनी देशामध्ये २०२४ पर्यंत १० लाख सरकारी नोकरी देण्याची घोषणा दिली असली तरी ही आकडेवारी पाहता गेल्या ८ वर्षामध्ये नोकरीसाठी अर्ज केलेल्या पैकी केवळ ०.३ टक्के जणांनाच नोकरी मिळाली आहे. शेती क्षेत्राची घसरती कामगिरीदेखील बेरोजगारी वाढविण्यासाठी कारणीभूत ठरत आहे.

हे सर्व पाहता ब्राह्मण समाजाचे भविष्य सक्षम करावयाचे असेल तर आपली तरुणाई आर्थिक दृष्ट्या साक्षर असणे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि हे अर्थविषयक जाणीव जागृतीचे काम भविष्यासाठी आपल्याला करायला हवे. आपल्या तरुणाईस आर्थिक नियोजनातून आनंदी जगण्याचा मार्ग दाखविणे आज गरजेचे. समाजातील उद्योजक, अर्थतज्ञ, बँकर्स, कर सल्लागार, फायनानसर्स इ. एकत्र आणून लघु उद्योग काढण्यासाठी तरुणाईला मार्गदर्शन व मदत करणे आवश्यक आहे. समाजातील मोठ्या उद्योजकांना लागणारे मनुष्य बळ अथवा कच्च्या मालाच्या पुरवठ्यासाठी आपल्याच समाजातील गुणी तरुण तरुणींना यासाठी हाताशी धरणे आवश्यक आहे. मोठ्या उद्योगांनी आणि गुंतवणूकदारांनी आपल्या वृद्धीसाठी ऊर्जा, दळणवळण तसेच पुरवठादारांचे स्वतःचे दहा छोटे छोटे गट बनवावेत असे नेटवर्क बनवून मएकमेकांस सहाय्य करुय चे तंत्र आता वापरले पाहीजे. समाजातील मित्र, नातेवाईक, सहकारी एकत्र येऊन तरुणाईस सामुदायिक भांडवलाच्या पुरवठ्याची योजना आखणे फायद्याचेच होईल. महाराष्ट्रातील राजकीय प्रणाली, राखीव जागा, राहणीमानाचा दर्जा, तुंटपुंज्या व्यवसायिक संधी, अत्यल्प नोकऱ्या यांना कंटाळून आपली बुद्धिमान व कष्टाळू तरुण पिढी इंग्लड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका आदि देशात स्थायिक होण्याचा कल वाढत आहे आणि या अनिवासी झालेल्या आपल्या पिढीची भारतातील गुंतवणूकीचा कल देखील अत्यल्प होऊ लागला आहे.

अल्पसा प्रयत्न म्हणून सर्व ब्राह्मण समाजातील उद्योगपती, व्यावसायिकांना आमची आग्रहाची विनंती आहे की, त्यांना लागणाऱ्या आवश्यक कुशल व अकुशल मनुष्यबळाविषयी आपल्या यसमाचारल मध्ये जाहीरात द्यावी. कोणतेही मूल्य न घेता ही जाहीरात छापली जाईल. तसेच जे कुशल तरुण-तरुणींना रोजगाराची आवश्यकता असेल त्यांच्यासंबंधीची माहिती सुद्धा समाचार मध्ये विनामूल्य छापली जाईल, असे नवीन सदर यापुढे समाचारमध्ये प्रसिद्ध करु, जेणेकरुन समाजातील उद्योजकांना, तरुण-तरुणींना योग्य त्या रोजगारच्या संधी उपलब्ध होतील. आपल्या समाजातील अनेक उद्योगपती, उच्चविभूषित असून परदेशात मोठ्या हुद्यावर तसेच त्यांचे स्वतःचे उद्योगही आहेत अशा उद्योगांना सुद्धा योग्य ते मनुष्यबळ आपण उपलब्ध करून देऊ शकतो. यासाठी समाजातील तरुणाईसाठी सेमिनार वगैरे आयोजित करायचा मानस असल्यास संस्थेचा दादर-मुंबई येथील सभागृह नाममात्र दरात उपलब्ध करून देता येईल. यावर विचारमंथन होणे गरजेचे आहे. तरुणाईच्या भविष्यासाठी चला एकत्र येऊया.

**- मिलिंद सरदेशमुख**

# विश्वात्मक श्रीराम हेच समर्थांचे रामतत्व

**स. भ. श्री. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

मनुष्य हा संवेदनाशील जीव आहे. समाजात घडणाऱ्या चांगल्या वाईट गोष्टींचा त्याच्या मनावर सातत्याने परिणाम होत असतो. अशावेळी मन स्थिर करणारी गोष्ट म्हणजे भगवंताचे अधिष्ठान होय. मोह-मायेने युक्त अशा या जगातून मनुष्याला तारुन नेणारी, ती एक नौकाच जणू परंतु फक्त कर्मकांडापुरतेच मर्यादित न रहाता त्या तत्वाचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून, तो अंगीकारण्याकडेही वाटचाल करणे आवश्यक असते. तत्व म्हणजे जीवन जगण्याचे मूल्य. समाजात वावरत असताना माणसाच्या वागणूकीवरून त्याची ओळख निर्माण होते. अशावेळी भगवंताचा आदर्श ठेवणे सर्वोत्तम ठरते.

ग्रंथराज श्रीमद् दासबोधातही असे म्हटलेलेच आहे की - एक गुरू, एक देव, कोठेतरी असावा भाव.

३३ कोटी देवीदेवतांचा विचार करत असताना, प्रभू श्रीरामचंद्रांचा अवतार, हा मनुष्य जीवनात आदर्श प्रस्थापित करण्यासाठीच घेतला असल्याचे दिसून येते.

राम, म्हटला तर एक छोटा शब्द, पण समजला तर एक तारक मंत्र! आपल्याकडे एकमेकांशी भेटल्यावर किंवा झोपेतून उठल्यावर दिवसाची सुरुवात राम-राम म्हणत करण्यापासून ते देहातले चैतन्य निघून गेल्यावर याच्यात काही राम राहिला नाही असं म्हणण्यापर्यंत राम नामाची सत्ता आहे. राम नामाचे जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे.

राघवाची कथा पतीत पावन । गाती भक्तजन आवडीने ।

खरेतर जीवनात रामाचे स्थान आहे म्हणण्यापेक्षा श्रीराम हेच जीवनाचं सार आहे असं म्हंटल तर वावगे होणार नाही. त्यामुळे समर्थांनी माणसातच राम पाहीला समर्थ म्हणतात -

नारायण असे विश्वी । त्याची पूजा करीत जावी ।<br>
या कारणे तोषवावी । कोणीतरी काया।

अंतःकरणातील राम पहा असे समर्थ त्यांच्या सामर्थ्यसंपन्न प्रभावी वाणीतून सांगतात.

प्रभू श्रीराम तत्व म्हणून पहाता परिपूर्ण आहेत. कसे? ते आता आपण पाहू. मनुष्य जीवन हे बालपण, तरुणपण व म्हातारपण या तीन टप्प्यात विभागले गेले आहे.

बालपण ही जीवनाची सुरुवात असल्याने, या काळात, जगाची ओळख करून घेतली जाते. संस्कारांची रुजवण देखील याच काळात होते. माता कौसल्या व पिता दशरथांच्या उदरी जन्माला आलेल्या श्रीरामांनी सर्वांना आपल्या बाललीलांनी मोहित केले होते. मोठ्यांप्रती आदर व लहानांप्रती स्नेह या त्यांच्या गुणांमुळे ते अतिशय प्रिय होते. गुरूकुलात विद्या अध्ययनासाठी जाताच त्यांनी कौशल्याने, बुद्धीने, परिश्रमाने व विनम्रतेने गुरुजनांचे मन जिंकले. राजपुत्र असतानाही ते अगदी एखाद्या सामान्य बालकासारखे राहिले. विविध विषयांमधे प्राविण्य मिळवत गुरूजनांची कास धरूनच त्यांनी मार्गक्रमण केले. आजचा बालकही काहीशी अशीच सुरूवात करतो बाललीलांनी मोहित करणे हा तर जणू गुणधर्मच आहे. परंतु मोठ्याप्रती आदर, लहानांप्रती स्नेह, समाजाप्रती आस्था, गुरूंप्रती विनम्रता या संस्कारांची रूजवणूक होणे देखील अनिवार्य असते. व्यावहारिक शिक्षण घेत असताना संस्कारांवरही लक्ष देणे, हे आजच्या काळत आवश्यक आहे असे दिसून येते.

तरुणपणी शक्ती व बुद्धी प्रचंड प्रमाणात असते. समर्थांनी शक्ती व बुद्धी या दोन्ही गोष्टींवर भर दिल्याचे आपल्याला दिसते. हनुमंतराय हे या दोन्ही उर्जेचे दाता आहेत. प्रभु श्रीरामाचे रामतत्व हनुमंतरायांच्या मार्फत

आपल्यापर्यंत पोहचते. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमीवरील राममंदिर हे समर्थांनी केंद्रस्थानी ठेवले होते. त्याला एक मोठा आधार म्हणजे समर्थ संप्रदायाचा एक श्लोक आहे.

स्वरुप संप्रदाय अयोध्यामठ । जानकी देवी श्री रघुनाथ दैवत ।

मारुती ऊपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी।

या श्लोकावरुन स्वरुपसंप्रदाय अर्थात रामदासी संप्रदायाचे अयोध्येशी असलेले अतिशय दृढ नाते पहावयास मिळते. समर्थांच्या परिभ्रमणाच्या कालखंडामधे समर्थांचे अयोध्येतील वास्तव्यात समर्थांनी अयोध्येतही मारुतीरायांची स्थापना केलेली आहे.

समर्थ स्थापित राममूर्तींच्या तुलनेत समर्थांनी मारुतीच्या मूर्तींची केलेली स्थापना व्यापक स्वरुपात आहे.

याचे मुख्य कारण समर्थच सांगतात -

शक्तीने मिळती राज्ये । युक्तने यत्न होतसे । शक्ती युक्ती जये ठाई । तेथे श्रीमंत नांदती।

बलोपासना संघटन आणी भक्तीभावाचं जागरण हे मारुतींच्या स्थापनेमागचे मुख्य कारण असावे असे वाटते.

समर्थस्थापित अकरा मारुती तर देव, देश आणि स्वधर्म रक्षणाच्या संकल्पनेतूनच झालेले आहेत असा विश्वास वाटतो.

परंतु आजच्या युगात बुद्धीवर जास्त जोर दिला जातो. बुद्धी तल्लख करण्याचे अनेक प्रयत्न बालपणापासूनच सुरु केले जातात. या काळात कुठेतरी शारिरीक सुदृढतेकडे दुर्लक्ष होते. समर्थांनी मात्र शक्तीचे महत्वही बुद्धीच्या बरोबरीने अनेकवेळा अधोरेखित केले आहे.

प्रभु श्रीरामांनी रावणासारख्या बलाढ्य शक्तीशाली राजाला परास्त केले ते शक्ती आणि बुद्धीच्या ताकदीवरच. समर्थांनी वेळोवेळी मनाचेही नियंत्रण वेळोवेळी करावयास सांगितले आहेत. मना सज्जना असे म्हणत समर्थांनी मनाचा स्टिअरिंग आपल्याला हाती घेण्यास सांगितले आहे. आजच्या युगात मनाचे विकार सर्वांना ग्रासत आहेत. समर्थांनी याचा उपाय सुमारे चारशे वर्षांपूर्वीच श्री मनाचे श्लोक लिहून करुन ठेवला आहे. मन, बुद्धी आणि शक्ती या तीन गोष्टींचा समतोल साधणे म्हणजेच रामतत्व अंगी बाणवणे.

आपल्या प्रत्येकाच्या अंगी ही तत्वे असतातच. एखादा कलाकार अद्भुत चित्र काढतो पण ते काढत असताना तो इतका मग्न होतो की स्वतःला विसरुन जातो. एखाद्या संकटाच्या काळी आपल्या अंगात कुठूनतरी प्रचंड शक्ती संचारते की नंतर आपलाच आपल्यावर विश्वास बसत नाही. अशा अनेक अनुभवातून आपण जात असतो तेव्हा कुठलीतरी शक्ती आपल्याकडून हे करवून घेते की काय? असा आपल्याला प्रश्न पडतो ती शक्ती म्हणजेच रामतत्व. या रामतत्वाची आपल्याला ओळख व्हावी आपण तो स्व चा पत्ता शोधावा हेच प्रत्येक आध्यात्मिक मार्गावरील वाटसरुचे स्वप्न असते. समर्थांनी यासाठी अनेकवेळा मनावर आणि आपल्या आत काय चालले आहे त्यावर लक्ष देण्यास सुचवले आहे. जसे -

चित्त सुचित करावें । बोलिलें तें जीवीं धरावें । सावध होऊन बैसावें । निमिष्य येक ।।१।। (द. ६ स. १)

कुठल्याही उपकरणात एका सुक्ष्म पातळीवर एक उर्जा कार्यरत असते तशीच आपल्या सर्वांमध्ये ही रामतत्वाची उर्जा वहात असते. आपल्या मनात या उर्जेचा वापर करायची इच्छा उत्पन्न होत असते व बुद्धी ते कार्य कसे पुर्ण करावे याचे मार्ग दर्शवत असते. कुठलेही सत्कर्म अथवा दुष्कर्म याच ठिकाणाहून पुढे जाते. त्यामुळे उर्जा , बुद्धी व मन यांचा समतोल अत्यावश्यक होतो. हा समतोल साधणे, त्याचा शोध घेणे हेच समर्थांना अभिप्रेत असावे. या सुवर्णमध्यालाच रामतत्व असे म्हंटले जाते. आधुनिक विज्ञानातही या त्रिकोणास अनन्यसाधारण महत्त्व आहे.

म्हातारपणी शक्ती व बुद्धी कमकुवत होते. बालपणीही ती शक्ती व बुद्धी कमी असते. परंतु बालपणी जर आपण योग्य मार्गावर प्रवास सुरु केला तर तरुणपणी नक्की आपण तो सुवर्णमध्य शोधून काढू शकतो.

समर्थांनी दाखवलेल्या मार्गावर आपण चालू शकलो तर ही गोष्ट आपण साध्य करु शकतो. हनुमंतरायांनंतर रामतत्वाचे अधिष्ठान समर्थांचे ठायीच दिसून येते. मन, बुद्धी व शक्ती यांचा योग्य वापर, यांचा योग्य विकास हेच आपल्या सर्वांना हवे असते. या गोष्टींनीच व्यक्तिमत्व बनते. रामतत्वाचा शोध घेणे हीच खरा व्यक्तिमत्व विकास आहे. मनुष्याचा जन्म हा एक छोटा काळ आहे ज्यात हे चिरंतन, अमर्याद रामतत्व समजून घेण्याची गरज आहे. त्याबाबत जागृती, अभ्यास व चिंतन होणे गरजेचे आहे.

या आदर्श देवतेबद्दल बोलण्यासाठी शब्द आणि लिहिण्यासाठी लेखणी अपूरीच पडते कारण रामतत्व हा सांगण्या लिहिण्यापेक्षाही केवळ आत्मानुभूतीचाच विषय आहे.माऊलींचे पसायदान सर्वश्रुत आहेच पण समर्थांचे पसायदानही किती सुंदर आहे पहा -

रघुनाथदासा कल्याण व्हावे । अतिसौख्य व्हावे आनंदवावे । उद्वेग नासो । वरशत्रू नासो ।

नाना विळासे । मग तो विलासो। अजयो न हो रे । जयवंत हो रे आपदा नको रे बहुभाग्य हो रे । श्रीमंतकारी जनहीत कारी । परोपकारी हरिदास तारी ।

# संलग्न संस्था वृत्त

**मंगळवेढा** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेतर्फे गुणवंत विद्यार्थी व हितगुज सखी मंच महिला सदस्यांचा सत्कार दिनांक २७ ऑक्टोबर २०२३ रोजी संपन्न झाला. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मंगळवेढा तर्फे इयत्ता दहावी, बारावी माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परिक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सुध्दा सत्कार करण्यात आला. श्रावण महिन्यात पंढरपूर येथे संपन्न झालेल्या हिंदवी महिला प्रतिष्ठान व राज ज्वेलर्स आयोजीत खेळ मंगळागौरीचा या राज्यस्तरीय कार्यक्रमात मंगळवेढयाच्या हितगुत सखी मंचचा प्रथम क्रमांक आला, या विजेत्या संघातील सर्व महिला सदस्यांचा सत्कार सुध्दा यावेळी समाजाच्या वतीने करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून लक्ष्मी नागरी पतसंस्थेच्या चेअरमन शुभदा पटवर्धन हया होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून प्रा. धनश्री कापशीकर या होत्या. यावेळी बोलताना शुभदा पटर्धन यांनी समाजातील माता वर्गांना आपल्या पाल्याबाबत जागरुक राहण्याचे सल्ला दिला तर मोबाईलच्या अतिवापरामुळे बालवयात होणारे नुकसानी बद्दल जागरुकता त्यांनी यावेळी करुन दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष धनश्री कापशीकर यांनी अध्यक्षीय भाषणात उपस्थित पालक वर्गांना मुलांच्या शिक्षणाबद्दल आणि आरोग्याबद्दल काळजी घेण्याचे आवाहन केले.यावेळी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुंबईचे कार्यवाह संजय कुलकर्णी यांनी मंगळवेढयातील मुलांचे शैक्षणिक प्रोत्साहना करिता मध्यवर्ती मंडळामार्फत सर्व विद्यार्थ्यांना आलेली शिष्यवृत्ती व शैक्षणिक मदत वाटप करण्यात आली ३१ हजाराची रुपये एवढी रक्कम मिळाल्याचे आर्वजुन सांगून या संस्थेचे आभार मानले. तर हितगुत सखी मंचला प्रोत्साहनपर बक्षिस देऊन मंचच्या ज्येष्ठ महिला सदस्या वैशाली जोशी यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सुरुवातीस गुरुदत्त भजनी मंडळामार्फत भजनसंध्या घेण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दामाजी न्यूजचे वृत्तनिवेदक वासुदेव (नाना) जोशी यांनी केले तर प्रास्ताविक स्वामी समर्थ पतसंस्थेचे चेअरमन रामचंद्र कापशीकर यांनी केले, आभार प्रदर्शन अध्यक्ष अनंत कुलकर्णी यांनी मानले. यावेळी प्रभाकर कुमठेकर, वैभव मोडक, एन.जे.कुलकर्णी, सुहास जोशी, मोहन जोशी, मिलींद कुलकर्णी, नागेश कुलकर्णी यांच्यासह बहुसंख्य नागरिक, विद्यार्थी वृंद, हितगुज सखी मंचच्या सर्व महिलां सदस्यांसह इतर महिला वर्ग सुध्दा उपस्थित होता. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संदिप कुलकर्णी, कृष्णाथ जोशी, अमोल जोशी, जितेंद्र बडोदकर आदीजणांनी परिश्रम घेतले.

**नाशिक :** रविवार, दि. १५ ऑक्टोबर २०२३ ते २४ ऑक्टोबर २०२३ पर्यंत प्रतिवर्षीप्रमाणे नवरात्र महोत्सव साजरा करण्यात आला होता. रविवार दि. १५.१०.२०२३ रोजी सकाळी ८.०० वाजता घटस्थापना संस्थेचे कार्यकारणी सदस्य श्री. किशोर माधवराव हिंगणे यांच्या हस्ते झाले. गुरुवार दि. १९.१०.२०२३ रोजी सकाळी ८.०० वाजता ललितापंचमी निमित्त प्राकृत देवीमहात्म्य पठण तसेच रविवार दि. २२.१०.२०२३ रोजी दुर्गाष्टमी निमित्त होमहवन व पुर्णाहुती, सायंकाळी ६.०० वाजता यजमान श्री. सुधीर व सौ. विजया म्हैसरपूरकर यांच्या हस्ते संपन्न झाली. तसेच दि. १४ ते २४ ऑक्टोबर पर्यंत रोज सकाळी ८ वाजता अभिषेक व आरती तसेच दुपारी ५.३० वाजता भजन आणि सायंकाळी ७.०० वाजता आरती असे नित्य कार्यक्रम झाले. या नवरात्रौमहोत्सवाच्या कार्यक्रमांस भाविक व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

**पुणे :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था पुणे स्थापना कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १८४६ दि. २९ ऑक्टोबर १९२४ शताब्दीकडे वाटचाल. नोव्हेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२४ हे संस्थेचे शताब्दीवर्ष आहे. या वर्षामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेने आपल्या कार्याची मुहुर्तमेढ श्रीमंत सरदार पुरंदरे यांच्या वाड्यात रोवली. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या मुंबई इलाख्यातील पहिली संस्था म्हणून या संस्थेची नोंद आहे. समाजाची सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक अशा विविध बाबतीत उन्नती करावी या उद्देशाने स्थापन झालेल्या संस्थेचे अनेक शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक कार्य सुरु आहे. संस्था प्रतिवर्षी ६० ते ७० हजारांची विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक व आर्थिक मदत व परतफेडीची शिष्यवृत्ती यावर खर्च करीत उल्लेखनीय कार्य करीत आहे. संस्थेच्या उपक्रमांमध्ये महिलांचाही सहभाग मोठ्या प्रमाणावर असून संस्थेच्या शहर व महिला शाखा, मुकुंद नगर महिला शाखा व सहकार नगर महिला शाखा अशा तीन महिला शाखा आहेत. संस्थेच्या शताब्दी वर्षाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**डोंबिवली :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली यांचा कोजागिरी पौर्णिमा महोत्सव २८ ऑक्टोबर २०२३ ला वक्रतुंड सभागृह गणेश संस्थान येथे अत्यंत उत्साहात साजरा झाला. सर्वप्रथम सर्व उपस्थित महिला सभासदांनी सुरेख भोंडला सादर केला. ज्याचे नेटके नियोजन महिला समिती प्रमुख सौ. शुभदा कुलकर्णी व सहकार्यवाह सौ. निलीमा चिंचणकर यांनी केलं होतं.मोत्याच्या माळांनी सजवलेला लाल हिरव्या रेशमी वस्त्राने आच्छादित चौरंगावरचा, देखणा शुभ्र गजराज आणि त्या भोवती रंगीबेरंगी भरजरी वस्त्राने लेवून आलेल्या, विविध अलंकारांनी नटलेल्या, सर्व वयोगटातील महिला सभासदांनी, भोंडल्याच्या पारंपारिक गाण्यावर धरलेला तालबद्ध फेर हे अतिशय नयनरम्य दृश्य पहात रहावे असेच होते. मग खमंग खाऊच्या खिरापतीची पाकीटे वाटण्यात आली. अनुराधाताई मोहिदेकर यांनी सर्वांचं स्वागत केलं आणि कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व विशद केले. संस्थेचे



अध्यक्ष श्री. जगन्नाथ जोशी यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, कोजागिरी पौर्णिमा हा आपल्या संस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. कारण १९६९ साली ह्याच दिवशी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली या संस्थेचा शुभारंभ झाला आणि ५४ वर्षापूर्वी लावलेल्या रोपट्याचा आता विशाल वटवृक्ष झाला आहे, तसेच कार्यकारिणीच्या व इतर सर्व सभासदांच्या उत्तम सहकार्यामुळे संस्था उत्तरोत्तर लक्षणीय प्रगती करत आहे. २०२३ मध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व सभासद बंधू-भगिनींच्या सत्काराचा कौतुक सोहळ्यात अमृत पुत्रांना चांदीचे नाणे आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. उत्सव मूर्तींनी संस्थेला उदारहस्ते देणग्या दिल्या व संस्थेवरचे आपले प्रेम व्यक्त केले. यानंतर सौ. शुभदा कुलकर्णी यांनी कथाकथन केले. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि रोख रकमेची पारितोषिके देऊन सत्कार केला गेला तसेच महिला समितीतर्फे झालेल्या विविध स्पर्धांमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवलेल्या महिला सभासदांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. कु. रिया कुलकर्णी या चिमुरडीने समर्थ रामदासांची एक रचना गायली. या कार्यक्रमाचे उत्तम निवेदन अनुराधा मोहिदेकर तसेच युवा समितीच्या प्रमुख सौ. पल्लवी आंबेकर यांनी आभार प्रदर्शन केले. दहा डिसेंबर २०२३ ला होणाऱ्या संस्थेच्या स्नेहसंमेलनाबद्दलही अध्यक्षानी विस्तृत माहिती दिली आणि स्नेहसंमेलनात मोठ्या संख्येने येण्यासाठी सभासदांना आवाहन केले.

**संभाजीनगर** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजमंडळ व ब्राह्मण बिझनेस मंच आयोजित सप्तपदी मंगल कार्यालयात घेण्यात आलेल्या यदिवाळी ब्रह्मोत्सवालाल खूप छान प्रतिसाद मिळाला. प्रदर्शनात ३० ते ३५ स्टॉल धारकांनी सहभाग नोंदवला होता. दिवाळी ब्रह्मोत्सवाचे प्रकल्प प्रमुख श्री. नरेश पटवर्धन, श्रीमती मोनिका शंतनु चौधरी यांनी खूप परिश्रम घेतले. तसेच प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नरेश जोशी, उपाध्यक्ष श्री. रवि जेवूरकर, सचिव श्री. अनंत कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. अंबादास कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्री. श्रीपाद मुगटे, श्री. वैभव देशपांडे व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दिवाळी ब्रह्मोत्सव उत्कृष्टरित्या पार पडले.

## मनाचिया गुंती - जीवनाचा अनादि अनंत प्रवाह..

**संगीता कुलकर्णी** (मो. : ९८७०४५१०२०)

मन... देवाने माणसाला दिलेली न दिसणारी नाजूक भेट... प्रत्येक व्यक्तीच सुख हे त्याच्या मनात लपलेलं असतं... मन... या मनाचे एकात एक गुंतलेले लक्षावधी धागे... त्यातूनच ओंजळीत येणारे काही क्षण कधी रेशीमलडीं सारख्या उलगडणार्या तर कधी धारदार पात्यासारख्या लखलखणाऱ्या जाणिवा... विचारांची प्रगती मनाच्या अनेक वर्षांच्या धावपळीचं फळ आहे. मनाचा हा अनेक वर्षांचा काळ वेगवेगळ्या नावांनी.. कधी मन प्रवासवर्णन या शब्दसमुहातून व्यक्त होईल तर कधी एखाद्या रागाच्या वर्णनानी ते मांडलं जाईल.. अवतीभवतीच्या जगातले आपणच आपापल्या परीनं एकमेकांची सुखदुःखं वाटून घेत असतो तर कधी साथसंगत करत असतो.. आपण नातीगोती जपायचा मनापासून प्रयत्न करत असतो आणि तो करतोही अगदी मनापासून...कधी रीत तसं करायला भाग पाडते तर तर कधी अंतरंगात दाटणारी प्रीत..!

अख्ख्या जगाबरोबरीने जुळवून घेताना कधी वाट्याला आलेली तर कधी असोशीने आपलीशी केलेली नाती जपत असताना तर कधी ह्याचं मन तर कधी तिचं मन जपताना आणि अशाच तर्हेने आणखी कोणाकोणाची मनं जपत जगू पाहताना एखाद्या लख्ख क्षणी स्वतःलाच उलगडू पाहतं स्वतःचं मन. नजरेला

नजर भिडवत आपल्याला त्याच्या अस्तित्त्वाची ओळख पटवू पाहतं... पाहत असतं.. इतकच नाही तर आपल्याच मनाशी नातं जुळतानाचा हा प्रवास इतका ही काही सोप्पा नसतो बरं....मृदूमुलायम पायघड्याही घातलेल्या नसतात नी सारं काही स्पष्ट दिसायला समजायला आणि आहे तसं उमजायला कित्येक दरवाजे उघडावे लागतात नी उघडायचे ही असतात. पलिकडे जे काही असेल त्याच्याशी डोळा भिडवायची हिंम्मत असावी लागते किंवा खात्री नाही म्हणून बंद दरवाजे बंदच ठेवायचे...

जगापासून लाख लपाल हो पण मनापासून कसं जपाल? मनाला फसवून मनाला नाकारत कुठे लपाल? जगाच्या कोलाहलात हरवाल की दूर दूर कोणता तरी सांदीकोपरा शोधाल? अहो पण मनाला काहीच वर्ज्य नाही ना आणिमनाला कुठेच अटकाव ही नाही असो ते शोधतं तुम्हांला अगदी अचूक अगदी बरोबर पण शोधल्यावर फार काही प्रश्न वगैरे विचारत बसत नाहीत बरं. फक्त नजर देतं तुमच्या नजरेला.. पण त्या नजरेत अनेक प्रश्न असतात बरं..! आणि अजून बरंच काही असतं आव्हानं असतात..पर्याय असतात... आवडती तर कधी नावडती उत्तर ही तुम्ही ते पेलू शकत असलात तर तुम्हारी बलासे नाही जमलं पेलायला तरीही तुम्हारी बलासेच.... मनाला काहीही सोयरसुतक नसतं त्याचं ..ते फक्त आपल्याला आरसा दाखवणार असतं...

जगण्याच्या या अफाट रेट्यामध्ये कधी अचानक अनपेक्षितरीत्या स्वतःचच मन समोर येऊन उभं राहतं.. नेहमी साथ संगत करणारं हे मन कधीतरी जीवघेणी कोंडी घेऊनही सामोरं येतं तर प्रसंगी अनोळखी बनून जातं... सहसा बळ देणारं मन कधीतरी एखाद्या शांत-क्लांत क्षणी थकून स्वतःच दुबळं बनून तुकड्यांतुकड्यांत विखरत राहतं.. एक तुकडा इकडे तर एक तुकडा तिकडे... यातला माझा तुकडा नक्की कोणता? कोणत्या तुकड्याला आपला म्हणायचा? हे सगळे तुकडे तर एकत्र सांधणं म्हणजे जणू काही परीक्षाच... नक्की कोण आहे हे? माझंच मन आहे ना हे ..!! असा प्रश्न मात्र मनात येतो..येत राहतो...

हेच आपलं मन कधीतरी उभा दावा मांडतं.. मन आपलंच असतं नीआपल्याच आधाराने रहात असतं की आपण राहतो मनाच्या आधाराने? पण त्याची मस्ती तर बघा..! पण आपला काहीही इलाज चालत नाही..हवं तसं फरफटत नेतं आपल्याला त्याच्या जगात... नाना प्रकारच्या इच्छा, संवेदना, राग-लोभ हे सारं सारं कुठून येतं? श्वास कोंडायला लावणारे व घुसमट करुन टाकणारे प्रश्न.. असंख्य खजिनाच असतो मनापाशी... कुठून जमवतं? कुठे दडवतं? हे मन.. नेमक्या एखाद्या तलम अचूक वेळीच आपल्याला आठवणही करुन देतं तर सुख आणि दुःखांच्या तलम धूसर आठवणींवरही जीव प्राण कंठाशी येईपर्यंत झुलवत ठेवतं... सवडीनं कधीतरी निवांत वेळी प्रकाशाची उबदार तिरीप अलगद तुमच्यापर्यंत आणून सोडणार्या खिडकीत बसून शिळोप्याच्या गप्पा केल्यासारखं नी अलवारपणे गुपित वगैरे सांगितल्या सारखं वागायला सवड असते मनापाशी... हजार सुया एकाच वेळी भोसकाव्यात तसं प्रश्नांची जाणिवांची उधळण करत बघता बघता छिन्न विछिन्न करुन ही टाकतं मग मागाहून सावरायचे सोहाळे करायचे...

आयुष्याचा गूढ अनाकलनीय चेहरा त्याच्याशी डोळे भिडवून पाहणारं फक्त मनच... सुख-दुःखं, आनंद आशा-निराशा ह्या सार्या सार्याला आपल्या ठायी आसरा देणारं नी आपलंस करणारं आणि असंख्य गोष्टी तळागाळात लपवून ठेवून जपणारंही मनच की.. प्रसंगी भांबवणारं भयभीतही होणारं आणि प्रत्येक टप्प्यावर इतर कोणी साथ दिली नाही वा प्रसंगी स्वतःची सावलीही दूर झाली तरीही उभा जन्म आपली अंतःस्थ शक्ती पणाला लावून तोलून धरणारं मन... कधीतरी मनाशी नजरभेट करायची आणि मनाची लख्ख नजर तोलायची उमज येते आणि ती आली की हळूहळू सूर लागतो.. मनोमन संवादाचा एक धागा जुळतो... भोवतालचा कोलाहल विरु लागतो नी काळोख उजळू लागतो... मुक्ततेच्या सोहळ्याला सुरुवात झाली ही तर नुकतीच सुरुवात..! तुमचं आमचं टोचणारं दुःखं, सलणारे अपमान, पराभव, झुळझुळणारी सुखं ह्या सार्याचं गाठोडं बांधलेलं असतंच मनाने... ह्याची स्वीकृतीही

शिकवतं मन..आनंदसोहळा आता फार दूर उरलेला नसतो. अंतरात जमलेली महफिल आता सरणार नसते... ह्या सार्याचे मनाशी नाते जुळले की ह्या सगळ्यांमधून झंकारणारा एक सुरेल नाद सर्व आयुष्याला व्यापून राहूनही उरेल हे भान एकदा का मनाने आणून दिले की अजून काय राहिले?..

## आजच्या काळातील श्रीकृष्ण

**सौ. हर्षदा मुकुंद पांडे (मो. : ९८२१६८६९३४)**

तर्कशुद्ध विचार करणे हा गुण बालवयातही प्रकर्षाने जाणवतो. अगदी लहानपणापासूनच त्याने बंडखोरी केली. पाऊस चांगला पडावा म्हणून गोकुळवासी देवांचा राजा इंद्र याची पूजा करत. पण आपल्या अजोड संवाद कौशल्याने कृष्णाने या साऱ्यांना पटवून दिले की गोवर्धन पर्वतामुळे पावसाळी ढग अडवले जातात, पावसाळा स्थिरावतो म्हणून पाऊस पडतो! तेव्हा इंद्राची नव्हे तर गोवर्धन पर्वताची पूजा करायला हवी. यावर इंद्र चिडला व गोकुळवासीयांवर जोरदार पाऊससरींचा मारा केला, पण आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून त्याच्याच खाली आश्रयाला आलेल्या सगळ्या गावकऱ्यांना सुरक्षित या कृष्णलीलेने सांभाळले.

श्रोते हो... भविष्यात साऱ्या जगावर कुठल्या देशाचा दबदबा असेल, वर्चस्व असेल? तर ज्या देशात अमाप पाणीसाठा आणि पाण्याचे स्त्रोत असतील तो देश! कृष्णाची तर्कशुद्ध विचारशैली आज आपल्याला यनदीजोड अभियानल याबाबत सहेतूक सजग जाण देते आहे. आपणास माहीतच असावे की सद्‌गुरु जग्गी वासुदेव यांनी सगळ्या भारतीयांना व विशेषतः तरुण वर्गाला याबाबतची दूरदृष्टी दिली आहे आणि या देशातील विविध नद्यांना जोडणाऱ्या उपक्रमासाठी काम करण्यास प्रेरित केले आहे. यामुळे भारतासारख्या शेतीप्रधान देशासाठी हे खूप क्रांतिकारी पाऊल ठरेल.

या वर्षी तर ओल्या दुष्काळाच्या संकटाने सारा भारत देश बेजार झाला आहे. बहुतांश धरणं ही १०० टक्के भरली आहेत. धरणाचे दरवाजेही उघडण्यात आले आहेत. पण तरीही पुढच्या वर्षी मार्च-एप्रिल-मे मध्ये आपल्याला पाणी टंचाई भासणार नाही याची खात्री नाही. याला कारण बहुतांश धरणांच्या तळाशी मोठ्या प्रमाणात गाळ साठला आहे. त्यामुळे धरणांची पाणी साठवण्याची क्षमता कमी होते आहे. त्यासाठी अनेक धरण उपसा मोहिमेवर काम करीत आहेत. मिलिटरीमधून सेवानिवृत्त सुरेश पाटील हे अग्रगण्य नाव. (खडकवासला धरण उपसा)

शिशूपालाचे १०० अपराध पोटात घातले, पण त्याने १०१ अपराधांची सीमा ओलांडताच आपल्या सुदर्शन चक्राने फक्त त्याच्यावरच हल्ला करून त्याचे शिर धडापासून वेगळे केले व प्रजाजनांचे रक्त वाहू दिले नाही.भारताच्या सीमेपलीकडून घुसखोरी, दहशतखोरी हल्ले यातून पाकिस्तान भारताची अंतर्गत शांतता, सुव्यवस्था व सुरक्षा याला आघात पोहोचवतोय तेव्हा 'दहशतवादी अड्डे' यांनाच निव्वळ लक्ष्य करत भारताने केलेला Surgical Strike हा कृष्णाच्या गनिमी कावा युद्धनीतीचाच भक्कम आधार वाटतो मला!

आपली आजची युवापिढीही कृष्णाची ही युद्धनीती छान आचरणात आणतेय. धर्मरक्षणार्थ नेहमी शस्त्रच उपसावे लागते असे नाही हे तरुणपिढीने सिद्ध केले आहे. हल्ली बॉलीवूड कलाकारांमध्ये हिंदू धर्माबद्दल, हिंदू देव-देवतांबद्दल अपशब्द बोलण्याची फॅशन आहे. 'लालसिंग चड्ढा' हा अमीर खानचा सिनेमा जोरदार आपटला. तरुण युवावर्गाने त्याकडे पूर्णतः पाठ फिरवली. या आर्थिक नुकसानीचा धक्का इतका जबरदस्त बसला की, अमीर खान २ महिने ब्रेक घेतला!

युद्ध जिंकण्यासाठी शतूपक्षाचे मानसिक खच्चीकरण हाही कृष्णाच्या युद्धनीतीचाच भाग होता. कौरव-

पांडवांचे युद्ध सुरु झाल्यावर योग्य वेळी कृष्णाने कर्णाची भेट घेतली. कारण या युद्धात कर्णासारखा धनुर्धर अर्जुनाला मात देऊ शकतो हे कृष्ण जाणून होता. त्या कर्ण भेटीत कृष्णाने कर्ण हा पांडवांचा मोठा भाऊ आहे, कुंतीपुत्र आहे हे कर्णाला सांगून त्याला भावनिक केले, त्याचे मनोधैर्य खचले व अर्जुन सोडून इतर ४ पांडवांच्या जीवावर हल्ला न करण्याचे वचन कृष्णाने मिळवले. चीन या शेजारील राष्ट्राची भारतावर वाईट दृष्टी आहे, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान आणि भारत या ४ देशांचा समूह Indo Pacific Region मध्ये भारताला सबळ करतो. भारताच्या समुद्र किनाऱ्यावर चीनची सैनिकी हालचाल वाढताच भारताला या तीनही देशांचा पाठिंबा मिळतो, पाठबळ मिळतं. अशा तऱ्हेने चीनचे मानसिक दडपण वाढवले जात आहे.

कृष्णाच्या सदैव ज्ञानार्जनाच्या भुकेमुळे त्याचे व्यक्तिमत्त्व चतुरस्त्र झाले. चारही वर्ण तो यशस्वीपणे जगला. कंस आणि इतर नराधमांना यमसदनाला पाठवून त्याने आपले क्षत्रियत्व सिद्ध केले. गीता सांगून त्याने ब्राह्मण वर्गही सिद्ध केला. सुंदर नगरी द्वारका उभारून, तिथल्या यादवांना अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध करून देऊन व्यापार उभा केला. तो वैश्यही जगला! विनम्र सेवाभावी माणूस, इतरांच्या सुखासाठी झटतो तो शुद्र! कुठल्याही धार्मिक, सामाजिक सोहळ्यात अनेक लोक जमा होत तिथे कृष्ण जेवणाच्या पंगतीनंतर उष्टे-खरकटे उचलून, भांडी धुवून स्वच्छ करत असे. पांडवांनी राजसुय यज्ञ केला तेव्हाही. त्याप्रसंगी ही शुद्राची सेवाभावी वृत्ती परमानंद देते हे आपल्या कर्माने जगाला सप्रमाण दाखवून दिले. कृष्ण ही व्यक्ती नसून अनेक उत्तमोत्तम गुणांचा समुच्चय आहे. या कलियुगात त्यांच्या एक-एकच गुणांचे प्रतिनिधित्व करणारे कृष्ण सापडतात. अभिमान याचा वाटतो की, ज्याला कालसीमा बंदिस्त करु शकत नाही अशी कृष्णनीती कालातील आहे. भूतकाळातील आणि वर्तमानकाळातील अनेक यशस्वी व्यक्तींच्या कृतीत कृष्णनीतीच काम करताना दिसते.




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC

STAR Health Insurance
The Health Insurance Specialist

*Get Insured... & Be Secured....*

## एकनाथ महाराजांच्या भागवत ग्रंथाला ४५० वर्ष पूर्ण

पंढरपूरमधून यावर्षी शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या भागवत ग्रंथाला ४५० वर्षे पूर्ण झालेत. यानिमित्त आज पंढरपुरात वारकरी संप्रदायाकडून भागवत ग्रंथाची हत्तीवरून भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. ही दिंडी पाहण्यासाठी हजारो वारकऱ्यांनी गर्दी केली होती. यावेळी फुलांची पुष्पवृष्टी आणि टाळ मृदुंगाच्या जयघोषात भागवत ग्रंथदिंडी काढण्यात आली.

शांतिब्रह्म एकनाथ महाराज यांच्या भागवत ग्रंथाला ४५० वर्ष पूर्ण झाल्या प्रित्यर्थ वारकरी संप्रदायाच्या वतीने नामदेव पायरीपासून भागवत ग्रंथाचा हत्तीवरून भव्य ग्रंथदिंडी सोहळा संपन्न झाला. तब्बल ४५० वर्षापूर्वी भागवत ग्रंथाचे काम पूर्ण झाल्यावर श्रीक्षेत्र काशी येथे एकनाथ महाराज आणि भागवत ग्रंथाची अशाच पद्धतीने हत्तीवरून मिरवणूक काढून सन्मान करण्यात आला होता. याच दिवसाच्या आठवणीनिमित्त आज वारकरी पाईक संघ आणि इतर वारकरी संघटनांकडून या भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली.

## नवदुर्गा सौ. अलका मुकुंद कुलकर्णी



मूळच्या उस्मानाबादच्या. शालेय जीवनात टेबिल टेनिस खेळात राष्ट्रीय स्तरावर मिळविलेले प्राविण्य हा त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. नाशिक येथील उद्योजक श्री. मुकुंदराव कुलकर्णी यांच्या त्या सुविज्ञ पत्नी आहेत. टेबल टेनिस या खेळातील प्राविण्याने त्यांनी महावितरणमध्ये नोकरी केली. महावितरणमध्ये नोकरी करताना त्यांना महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार मिळाला होता. २०१४ मध्ये नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घेऊन पतीच्या एस.एम. ऑटो स्टॅपिंग लि. या समूहात फायनान्स व अकाऊंट संचालिका म्हणून त्यांनी काम करीत संस्थेस प्रगतीपथावर नेण्याचे काम केले. सध्या ही कंपनी बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये नोंदणीकृत असून आता नॅशनल स्टॉक एक्स्चेंजमध्ये नोंदणीकृत करण्याचा पुढचा प्रवास त्यांचा सुरु आहे. नाशिक जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन समितीच्या कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांना मान मिळाला आहे. याच प्रवासात समर्थ सहकारी बँकेच्या संचालिका व उपाध्यक्ष म्हणून देखिल त्या काम पाहत आहेत. राज्यातील १२००० महिलांना एकत्र करून बचत गटांच्या मेळाव्याच्या आयोजनामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ या ५० शाखांचा विस्तार असणाऱ्या संस्थेच्या त्या कार्यकारिणी सदस्य म्हणून कार्यरत असून नाशिक रोड संकुल प्रमुख ही जबाबदारी देखिल सांभाळत आहेत. तसेच आर. जे. चव्हाण बिटको गर्ल्स हायस्कूल शाळेच्या त्या अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. राष्ट्राची भावी पिढी घडविण्याचे आणि शिक्षण क्षेत्रात मुलींसाठी कौशल्य विकास आधारित शिक्षण व प्रबोधनाचे कार्य त्या करित आहेत. उद्योजक पती, उद्योजक दोन मुले, सूना, नातवंडे अशी कौटुंबिक जबाबदारी यशस्वीपणे पार पाडीत सामाजिक क्षेत्रातील आदर्शवत सौ. अलका मुकुंद कुलकर्णी या नवदुर्गेचा ज्ञातीला अभिमान वाटतो.

# SHRI YASH TOURS

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS

E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | डिसें.१ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू.१३,००० + रेल्वे |
| इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, मांडू | डिसें.१६ — ४ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १८,००० + रेल्वे |
| गुजरात , सोमनाथ, द्वारका, पोरबंदर, गीरनार | जाने. २ ते ७ — ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. १५,००० + रेल्वे |
| शृंगेरी, उडिपी, गोकर्ण, मुरडेश्वर | जाने. १५ — ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २४,५०० + विमान |
| मदुराई, कोडाई केनॉल, तंजावर, रामेश्वर | जाने. २५ — ५ रात्र<br>खर्च प्र.रू. २३,००० + विमान |
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर,जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | फेब्रु. १४ — ६ रात्र<br>खर्च प्र. रू.३१,५०० + विमान |
| पिठापुर (श्रीपाद श्रीवल्लभ जन्मठिकाण) भुवनेश्वर, जगन्नाथ पुरी, कोणार्क | फेब्रु. २३ — ५ रात्र<br>खर्च प्र. रू. २५,००० + विमान + रेल्वे |
| काश्मीर - श्रीनगर, पहलगाग, सोनमार्ग, - गुलमर्ग व कारगील | मार्च २६ — ७ रात्र<br>एप्रिल २, ९, १७,<br>खर्च प्र. रू. ३३,००० + विमान |

सुचना - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing) , ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व रात्रीचे भोजन, स्थळदर्शन व स्थळ मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.
- जी.एस.टी. टॅक्स स्वतंत्र द्यावा लागेल.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे.......................................................................................................**

● **डॉ. रुपक मकरंद कारुळकर** ब्राह्मण शाखा : देशस्थ, गोत्र : कौशिक, जन्म दिनांक : २०.०५.१९९४, जन्म वेळ : दु. ०२.३२, जन्म स्थळ : पुणे, उंची : ५.७, नाडी : आद्य, रास : सिंह, गण : मनुष्य, नक्षत्र : उत्तरा, शिक्षण : Phd Robotics, Controle System, नोकरी / व्यवसाय : सॉफ्टवेअर इंजिनिअर, Robotics, Portland, USA, रक्तगट : AB+, मासिक उत्पन्न : १२५००/- USD, अपेक्षा : कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेतील अमेरिकेत राहणारी, International degree holder, अथवा इथे नोकरी करत असल्यास अमेरिकेत ट्रान्सफर मिळू शकणारी, उंची ५-५.७, अव्यंग, निरोगी. संपर्क क्र. : ९८८१७१७१३० / ९८२२०३७२५५. Email : mmkarulkar@gmail.com, mskarulkar@gmail.com.

● **ओंकार प्रकाश ढवळे** जन्मतारीख - २४.०६.१९९१, जन्म ठिकाण - मुंबई, ब्राह्मण शाखा - कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र - वशिष्ठ, गण - देव, नाडी - मध्य, उंची - ५.७, वर्ण - गोरा, रक्तगट - AB+, शिक्षण - B.Com., LLB (Gen.), नोकरी/व्यवसाय पूर्ण वेळ शेअर मार्केट, वार्षिक उत्पन्न - ३ लाख, अपेक्षा - नोकरी करणारी, सुस्वरुप, मनमिळावू, संपर्क - ९००४६९६९८०.

## देणगी

अखिल देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळाचे सन्माननीय सदस्य विलेपार्ले मुंबई येथील जेष्ठ आणि प्रख्यात अभियंता, नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीचे संचालक श्री. पद्माकर यशवंत मंजुरे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ करीत असलेल्या सामाजिक कार्यास रु. १ लाख देणगीचा धनादेश देऊन मध्यवर्ती संस्थेबद्दल आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. मध्यवर्ती मंडळातर्फे दिलेल्या या भरघोस देणगीबद्दल आम्ही आभारी आहोत. या देणगीसाठी सहाय्य केलेले प्रसिद्ध अर्थतज्ञ श्री. उदय तारदाळकर तसेच श्री. आनंद कुलकर्णी यांचे देखील आभार.

## भावपूर्ण श्रद्धांजली



अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे सदस्य डॉ. श्री. हरी महाशब्दे यांच्या सुविद्य पत्नी स्त्रीरोग तज्ञ डॉ. सौ. सुनिता हरी महाशब्दे यांचे रविवार २९ ऑक्टोबर २०२३ रोजी दुःखद निधन झाले आहे. कर्तव्य कठोर, तेजस्वी व अतिशय प्रेमळ व्यक्तिमत्व असलेल्या पुणे विद्यापीठातून पी.एच.डी. प्राप्त, राधाकिशन तोष्णीवाल आयुर्वेद महाविद्यालय अकोल्याच्या प्राध्यापक व विभागप्रमुख, वैद्य खडीवाले संस्थान पुणे तर्फे 'सुश्रृत पुरस्कार' प्राप्त झालेल्या, श्रीमद् भागवत ग्रंथाचा सखोल अभ्यासिका अशा कालातीत व्यक्तिमत्वास आम्हां सर्वांचे सतशः प्रणाम आणि भावपूर्ण श्रद्धांजली. डॉ. श्री. हरी महाशब्दे यांच्या दुःखात सहभागी आहोत.

# समाजभूषण श्री. पद्माकर यशवंत मंजुरे

**शब्दांकन : श्री. मिलिंद सरदेशमुख**



अंगभूत गुणानी व अथक प्रयत्नाच्या जोरावर आयुष्यात यशाची व कर्तुत्वाची अनेक शिखरे पादाक्रांत करणारे ज्ञातीतील श्री. पद्माकर यशवंत मंजुरे यांच्याबद्दल आज आपण जाऊन घेऊया.

श्री. पद्माकर यशवंत मंजुरे यांचा जन्म १८ ऑगस्ट १९४० रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जुन्नर येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये झाले. १९५७ च्या मॅट्रीकच्या परिक्षेत ते शाळेत पहिले व बोर्डात २० वे आले होते. दोन वर्षे गर्व्हमेंट ऑफ पॉलिटेकनिक पुणे येथे शिक्षण घेतल्यानंतर एक वर्ष महाराष्ट्र इरीगेशन डिपार्टमेंटमध्ये काम करुन जमा झालेल्या पैशातून तसेच अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या शैक्षणिक मदतीमुळे अभियांत्रिकीचे शिक्षण कॉलेज ऑफ इंजिनिअरींग पुणे येथे केले. प्रखर बुद्धीमत्ता, जिद्द आणि अपार कष्ट करण्याची तयारी याच्या बळावर सिव्हील इंजिनिअरींगमधील पदवी प्राप्त केल्यानंतर शैक्षणिक काळातच त्यांनी महाराष्ट्र शासनाच्यावतीने राबविल्या जाणाऱ्या कोकणातील कुण्डलिका नदीवर धरणाकरता सर्वेक्षण केले. तसेच पुलासंबंधीच्या बांधकामाची आवड असल्याने पढील सखोल अभ्यासासाठी जगप्रसिद्ध व आंतरराष्ट्रीय कंपनीतर्फे पॅरिस व हॉलंड येथे प्रशिक्षण घेतले. एस.बी. जोशी कंपनीत निवासी अभियंता म्हणून कार्याची सुरुवात करत यशाचा चढता आलेख कायम ठेवला. आजतागायत ते ख्यातन्याम बहुराष्ट्रीय कंपनी The Freyssinet Prestressed Concrete Co. Ltd. मध्ये संचालक आहेत. रामगंगा नदीवर ६४९ मीटर लांबीचा पूल त्यांनी मुदतीच्या आधी सहा महिने पुरा केला. इंडियन रोड कॉंग्रेस या राष्ट्रीय संस्थेने त्यांच्यावर यपूल बांधणीतील उत्पादनांचा उपयोग व बळकटीकरणसंबंधी मार्गदर्शक तत्त्वेल बनविण्याची जबाबदारी सोपवली होती. नरोराची अणुभट्टी, पाटण्याचा गंगेवरील पूल, काक्रापारा पॉवर प्रकल्प या आणि अशा अनेक कामात महत्त्वाचा सहभाग आहे. रस्ते व पूलांची दुरुस्ती व पुर्नबांधणी करता प्रिस्ट्रेस्ड उत्पादने व त्यांच्या विविध पद्धतीच्या विकासात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे. निदान डझनभर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी ते सदस्य व पदाधिकारी म्हणून संबंधित आहेत. इंडियन रोड कॉंग्रेस ष राष्ट्रीय महामार्ग प पूलांच्या सर्वोच्च संस्थेत ते गेली तीन दशके सदस्य व उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. तसेच International Association for Bridge & Structural Engineering या संस्थेशीही ते दीर्घकाळ संलग्न आहेत. आतापर्यंत त्यांनी ४८ शोध निबंध, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध केले आहेत आणि पुरस्कार व पारितोषिकेही मिळवली आहेत. कोकण रेल्वेनी त्यांना अतिउत्कृष्ट कामगिरी व विशेष गुणवत्ता पुरस्कार दिला आहे. हैद्राबाद येथील हुसेनसागर तलावातील जिब्राल्टर खडकावर ग्रॅनाइटच्या एकसंघ खडकातून साकारलेला ३०० टन वजनाचा गौतम बुद्धाचा अतिभव्य व प्रचंड पुतळा १०० टनी चबुतऱ्यावर बसविण्याचे अवघड व आव्हानात्मक काम त्यांना यशस्वीरित्या पार पाडले आहे. साधी राहणी व उच्च विचार सरणी हा त्यांच्या जीवनाचा मूल मंत्र आहे. समाजातील बुद्धिमान, हुशार आणि होतकरू तरुण तरुणींना श्री. मंजुरे हे मार्गदर्शक आहेत. कर्तुत्वाने ओतप्रोत भरलेले आयुष्य जगणारे श्री. पद्माकत यशवंत मंजुरे यांचा आम्हाला अभिमान आहे.



*With*
*Best*
*Compliments*
*From*

S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**

Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

Best Wishes From

Reg. No. AR3/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357


**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**


**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2021-23,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## दे.ऋ.ब्रा. समाजमंडळ व ब्राह्मण बिझनेस मंच आयोजित दिवाळी ब्रह्मोत्सव उद्घाटन सोहळा, संभाजीनगर



Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH